महिला किसान सशक्तीकरण परियोजनेसाठी अनुसूचित जमातींना अर्थसहाय्य या योजनेसाठी आदिवासी घटक योजनेंतर्गत प्रलंबित राज्य हिस्सा निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुमाप्र - २०२१/प्र.क्र.१५०/योजना-३
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ फेब्रुवारी, २०२२

वाचा :-

१. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.एमकेएसपी-२०१३/प्र.क्र.२६६/योजना-३, दिनांक १७ डिसेंबर, २०१३.
२. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.के-११०११/०९/२०१६/एमकेएसपी/एएपी/एमएच, दिनांक ०३ जानेवारी, २०१८
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, एमएसआरएलएम, बेलापूर, नवी मुंबई यांचे क्र. एमएसआरएलएम/लेखा/१४७४/२०२१, दिनांक ०६ जुलै, २०२१ चे पत्र.
४. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.मजिअ-२०२१/प्र.क्र.९८/योजना-३, दिनांक १३ सप्टेंबर, २०२१.
५. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२१/प्र.क्र.०८/कार्यासन-६, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजनेकरीता आदिवासी घटक कार्यक्रमासाठी (TSP) अर्थसहाय्य या योजनेकरिता अनुक्रमे रु.४,२२,०१,४९५/- इतका निधी वितरीत केलेला असून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या थेट जमा झाला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजनेकरीता आदिवासी घटक कार्यक्रमासाठी (TSP) राज्य हिस्सा (२५०१ ए०५७) याकरिता रु.२,८१,०१,०००/- इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. त्यापैकी रु.४०,००,०००/- इतकी रक्कम संदर्भ क्र.४ अन्वये वितरीत केली आहे. सदर अर्थसंकल्पीत तरतूदीमधून केंद्र हिस्स्याच्या समरुप राज्य हिस्स्याचा सन २०१७-१८ मधील प्रलंबित निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजना आदिवासी उपयोजना क्षेत्राकरीता (TSP) राज्य हिस्सा (२५०१ ए०५७) याकरिता अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रलंबित

निधी रु.२,४१,०१,०००/- (रुपये दोन कोटी एक्केचाळीस लाख एक हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (B.D.S) द्वारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर रक्कम उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुपूर्द करण्यात येत आहे.

३. सदर रक्कम रु.२,४१,०१,०००/- इतका खर्च "मागणी क्र.टी-५, २५०१ ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम, ०१, एकात्मीकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१०) महिला किसान सशक्तीकरण परियोजनेसाठी अनुसूचित जमातींना अर्थसहाय्य (४०% राज्य हिस्सा) (कार्यक्रम), ३३, अर्थसहाय्य (२५०१ ए०५७)" या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदी मधून भागवावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशीर्षानिहाय / उपलेखाशीर्षानिहाय साध्य झालेल्या भौतिक उद्दीष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग व ग्राम विकास विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

६. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

७. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावे. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अमंलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

८. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत लेखाधिकारी कार्यासन क्रमांक योजना-२, ग्राम विकास विभाग यांचेकडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, ४) महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

९. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक्र दिनांक २४ जून, २०२१ अन्वये दिलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी तसेच राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय विभागांने त्यांचे स्तरावर वितरित करण्याच्या प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाचा अनौ.संदर्भ क्र.१९/व्यय-१४, दिनांक २८.०१.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०२२४१६३१३५००२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DILIP BABASAHEB PATIL

Digitally signed by DILIP BABASAHEB PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab277471707f6c88355be37b70bda72228dfe36fb01c0b5f8152a6d3ad3022fa, pseudonym=E96D61F7FACCEE19B6196702D3E9E4499C95F515, serialNumber=6721ACA60D5973C4D26547269488F4F9D7C98360213C1A8CA7ECCC36B35448FF, cn=DILIP BABASAHEB PATIL
Date: 2022.02.24 17:02:57 +05'30'

(दि. बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२) प्रधान सचिव व निवासी आयुक्त (गुंतवणूक व राजशिष्टाचार), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
४) उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
५) जिल्हा कोषागार अधिकारी , ठाणे.
६) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
७) कक्ष अधिकारी (का.६/का.१७), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) वित्त विभाग (व्यय-१४) व (अर्थ-१९) मंत्रालय, मुंबई-३२.
९) कार्यासन अधिकारी, वित्त-१, वित्त-७, योजना-२, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) निवडनस्ती.